नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २०७ Issue - 207 | वार शनिवार दि. १४ डिसेंबर २०२४ Blow- Saturday Date 14 December 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# सोमवारपासून हिवाळी अधिवेशन

## कॅबिनेट विस्ताराला अखेर रविवारचा मुहूर्त; नागपुरातील राजभवनात शपथविधी सोहळ्याचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: महायुती सरकार सत्तेवर येऊन आठवडा उलटला आहे. पण मंत्रिमंडळ विस्तार रखडलेला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून खातेवाटपाबद्दल खलबतं सुरु आहेत. महत्त्वाच्या खात्यांवरुन रस्सीखेच पाहायला मिळत आहे. त्यानंतर अखेर कॅबिनेटच्या विस्ताराला मुहूर्त मिळाला आहे. १५ डिसेंबरला म्हणजेच येत्या रविवारी नागपुरातील राजभवनात शपथविधी सोहळा संपन्न होईल. सोमवारपासून हिवाळी अधिवेशनाला सुरुवात होत आहे. आमदारांची गैरसोय टाळण्यासाठी नागपुरातील राजभवनात शपथविधी सोहळ्याचं आयोजन करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात भारतीय जनता पक्षाचे २१ मंत्री असू शकतात. तर शिवसेनेच्या १२, राष्ट्रवादी काँग्रेसच्या १० जणांना मंत्रिमंडळात स्थान मिळू शकतं. शिवसेनेला ९ कॅबिनेट आणि ३ राज्यमंत्रिपदं मिळणार असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. आता या १२ जणांमध्ये कोणाकोणाचा नंबर लागतो, हे पाहणं महत्त्वाचं आहे. सेनेच्या काही माजी मंत्र्यांविरोधात त्यांच्याच पक्षातील आमदारांच्या तक्रारी आहेत. त्यामुळे त्यांना डच्चू मिळण्याची शक्यता अधिक आहे. त्यांच्या जागी नव्या चेहऱ्यांना संधी मिळू शकते.



मुख्यमंत्रिपद सोडून उपमुख्यमंत्री झालेल्या एकनाथ शिंदेंकडे नगरविकास खातं कायम राहण्याची शक्यता आहे. याच खात्याच्या माध्यमातून शिंदेंनी उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना सेनेच्या आमदारांना मोठा निधी दिला. त्याचा फायदा त्यांना बंडावेळी झाला. सेनेच्या ४० आमदारांनी त्यांना साथ दिली. विशेष म्हणजे बहुतांश मुख्यमंत्री नगरविकास खातं स्वत:कडेच ठेवतात. विलासराव देशमुख, सुशीलकुमार शिंदे, अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, देवेंद्र फडणवीस या मुख्यमंत्र्यांनी नगरविकास स्वत:कडे ठेवलं होतं. पण ठाकरेंनी हे खातं स्वत:कडे न ठेवता ते शिंदेंकडे दिलं. देवेंद्र फडणवीस यांनी २०१४ ते २०१९ या कालावधीत मुख्यमंत्री असताना नगरविकास खातं स्वत:कडे ठेवलं होतं. त्यामुळे ते आता मुख्यमंत्रिपदावर आल्यानंतर पुन्हा एकदा नगरविकास स्वत:कडे घेतील, अशी शक्यता होती. पण काँग्रेसच्या अनेक मुख्यमंत्र्यांसह खुद्द फडणवीसांनी पाळलेली परंपरा मुख्यमंत्री खंडित करण्याच्या तयारीत आहेत. ठाकरेंनी स्वत:कडे नगरविकास खातं घेतलं नव्हतं. पण शिंदेंच्या रुपात ते सेनेकडे ठेवलं होतं. ठाकरेंनंतर मुख्यमंत्री झालेल्या शिंदेंनी लाडकं खातं स्वत:कडेच ठेवलं. पण मुख्यमंत्री झालेल्या फडणवीसांनी नगरविकास खातं सोडण्याची सोडण्याची तयारी दर्शवली आहे.

## थोडक्यात...

### एकाच दिवसात सोलापुरात मुले, महिला बेपत्ता होण्याच्या सात नोंदी

सोलापूर (प्रतिनिधी) शहरात दिवसेंदिवस मुले आणि महिला बेपत्ता होण्याच्या तक्रारीत वाढतचहोत आहे.शुक्रवारी शहरातील ३ पोलीस ठाण्यात मुले आणि बेपत्ता महिला बेपत्ता होण्याच्या ७ नोंदी नोंदवण्यात आले आहेत. साक्षी ज्ञानेश्वर चौगुले (वय-१९,रा.सायली हाइट्स वसंत विहार,सोलापूर) ही मुलगी ११ डिसेंबर रोजी घरातून निघून गेली आहे.रणधीर उर्जतसिंग निंबाळकर (वय-२१,रा. अवंती नगर, वीर गणपती जवळ सोलापूर) हा २१ वर्षाचा तरुण ११ डिसेंबर रोजी आई सोबत वाद-विवाद झाल्याने घरातून निघून गेला आहे.

प्रतीक्षा उत्तम रोकडे (वय-२३,रा. नाकोडा युनिटी सोलापूर) ही महिला १२ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजता राहत्या घरातून निघून गेली आहे.या तिन्ही घटनेची नोंद फौजदार चावडी पोलीस ठाण्यात झाली आहे.तर सचिन महादेव कटके (वय-४५,रा.भवानी पेठ,सोलापूर) हा इसम घरात कुणालाही काय न सांगता निघून गेला आहे. एमआयडीसी पोलीस ठाण्यात बेपत्ता नोंद झाली आहे.तर दिव्या गणेश मंजेरी ही मुलगी आजी घरी असताना निघून गेली आहे.तर राजशेखर धुळाप्पा वच्चे (वय-४६) हा इसम ८ डिसेंबर रोजी घरासमोरील शेजाऱ्याकडे चावी ठेवून निघून गेले आहेत.या दोन्ही घटनेची नोंद एमआयडीसी पोलीस ठाण्यात झाली आहे.

### उपचारादरम्यान वृद्ध महिलेचा मृत्यू

सोलापूर : राहत्या घरी तोल जाऊन पडल्याने केशरबाई हनुमंत रोकडे (वय ७५, रा. अपसिंगा, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) यांना बारा नोव्हेंबर रोजी उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले होते. मात्र त्यांच्यावर उपचार सुरू असताना १३ नोव्हेंबर रोजी सकाळी सव्वा अकरा वाजण्याच्या सुमारास त्यांचा उपचार सुरू असताना मृत्यू झाला. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## बांगलादेशातील हिंदूवर झालेल्या अत्याचारावर भूमिका घ्या : ठाकरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : देशाचं संसदेचं अधिवेशन सुरु आहे. तर महाराष्ट्रातलं अधिवेशन झालं. गेले काही दिवस कसं कामकाज सुरळीत चाललं आहे आपण बघतो आहे. विरोधक चांगले प्रश्न मांडत आहेत आणि सत्ताधारी उत्तर देत आहेत असं चित्र आहे असं म्हणतात. पण ही वस्तुस्थिती नाही. हिंदुत्वाचा विषय घेतला जातो आहे. बांगला देशात हिंदूवर अत्याचार होत आहेत. अन्याय होतो आहे. दोन ते तीन महिन्यांपूर्वी बांगलादेशचा क्रिकेट संघही आला होता तेव्हा आदित्यनेही सांगितलं होतं अशा देशाबरोबर खेळायला नको. सरकारने मात्र काहीही केलं नाही. गप्प राहिलं असं उद्धव ठाकरे म्हणाले.

बांगलादेशात हिंदूवर अत्याचार होत आहेत. इस्कॉनचं मंदिर जाळण्यात आलं. त्यांच्या प्रमुखांना अटक झाली तरीही गप्प आहोत. हिंदूवर अत्याचार होऊनही गप्प आहोत. माझी तमाम हिंदूतर्फे पंतप्रधान मोदींना विनंती आहे की जसं आपण एका फोनवर युक्रेनचं युद्ध थांबवलं होतं तसंच बांगलादेशात जे काही हिंदूवर अत्याचार होत आहेत त्याबद्दल भूमिका घ्यायला पाहिजे. नुसतं इथे बटेंगे, कटेंगे, फटेंगे वगैरे करुन उपयोग नाही. जिथे काही नाही तिथे छाती फुगवून दाखवू नका. जिथे अत्याचार होत आहेत त्यांना धमक दाखवण्याची गरज आहे असंही उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे.

आमच्या खासदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या भेटीची वेळ मागितली होती पण त्यांना ती नाकारण्यात आली. मी सांगितलं होतं की रितसर जाऊन पंतप्रधान नरेंद्र मोदींना पत्र द्यावं. कारण त्यांच्यामागे खूप व्याप आहेत. जगभरात फिरायचं असतं, भाषणं द्यायची असतात. त्यामुळे बांगलादेशातील हिंदूवर होणारे अत्याचार त्यांच्या लक्षात आले नसतील. मणिपूरचे अन्याय कळले नाहीत तसंच हिंदूवरचे अत्याचार कळले नसतील. त्यामुळे केंद्र सरकारने काय भूमिका आहे ते स्पष्ट केलं पाहिजे. शेख हसीना इथे आल्या त्या सुरक्षित आहेत. मात्र बांगलादेशातील गोरगरिब हिंदूचं काय? हे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सांगितलं पाहिजे. बांगलादेशातील इस्कॉनचं मंदिर जाळलं तर सिडकोचा डोळा मंदिराच्या जागेवर अशी बातमी मी वाचली आहे. हा भूखंड एकालाच जाणार आहे. दुसरी एक बातमी आहे हनुमानाचं दादर येथील मंदिर आहे त्याला भाजपाने नोटीस पाठवली आहे. ८० वर्षांपूर्वीचं मंदिर पाडायला निघाले आहेत यांचं हिंदुत्व कुठे आहे? असा प्रश्न उद्धव ठाकरेंनी विचारला आहे. हिंदू म्हणजे फक्त मतं नाही, वन नेशन वन इलेक्शन हे सगळं नंतर पाहता येईल. मात्र मतांपुरतंच भाजपाचं हिंदुत्व शिल्लक उरलं आहे का? असा सवालही उद्धव ठाकरेंनी केला आहे. हिंदूना भयभीत करायचं आणि त्यांची मतं घ्यायची. आता मंदिरं सेफ नाहीत मग कुठे गेलं यांचं हिंदुत्व असाही सवाल उद्धव ठाकरेंनी केला आहे.

## सिने अभिनेता अल्लू अर्जुनला अटक ; मृत महिलेच्या पतीने तक्रार मागे घेण्याची दर्शविली तयारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हैदराबाद : तेलुगू सिनेमांमधील सुपरस्टार अभिनेता अल्लू अर्जुन सध्या पुष्पा २: द रुल या चित्रपटामुळे चर्चेत आहे. ४ डिसेंबर रोजी हैदराबाद येथील संध्या थिएटरमध्ये या चित्रपटाचा प्रिमियर शो ठेवण्यात आला होता. यासाठी अल्लू अर्जुन अचानक संध्या थिएटरमध्ये पोहोचल्यामुळे एकच गोंधळ उडाला. चाहत्यांनी त्याला जवळून पाहण्यासाठी धावाधाव केली. त्यामुळे चेंगराचेंगरीची दुर्घटना घडून त्यात ३५ वर्षीय महिला रेवतीचा मृत्यू झाला होता. तसेच तिचा मुलगाही गंभीर जखमी असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान याप्रकरणी अल्लू अर्जूनवर गुन्हा दाखल झाला असून आज त्याला अटकही करण्यात आली. तसेच त्याला १४ दिवसांची कोठडी सुनावल्यानंतर अल्लू अर्जुनने अटकेपासून सुटका मिळविण्यासाठी तेलंगणा उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. दरम्यान आता या प्रकरणी मोठी घडामोड समोर आली आहे. ज्या महिलेचा मृत्यू झाला. त्या महिलेचा पती भास्कर याने माध्यमांशी बोलताना सांगितले की, त्याला अल्लू अर्जुनच्या अटकेची माहिती नाही आणि तो अभिनेत्याच्या विरोधातील सर्व तक्रारी मागे घेण्यास तयार आहे. माध्यमांशी बोलताना भास्करने सांगितले, अल्लू अर्जुनविरोधातील तक्रार मागे घेण्यास मी तयार आहे. चेंगराचेंगरीच्या प्रकरणात अल्लू अर्जुनला अटक झाल्याची मला कल्पना नाही. चेंगराचेंगरीच्या घटनशी अल्लू अर्जुनचा काहीही संबंध नाही.



दरम्यान अल्लू अर्जूनविरोधात एफआयआर दाखल झाल्यानंतर हैदराबाद पोलिसांच्या सेंट्रल झोनचे पोलीस उपायुक्त अक्षांश यादव यांनी सांगितले की, भारतीय न्याय संहितेच्या कलम १०५ (सदोष मनुष्यवधासाठी शिक्षा) नुसार अल्लू अर्जुनवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच कलम ११८ (जाणूनबुजून इतरांच इजा पोहोचवणं) याचीही नोंद एफआयआरमध्ये करण्यात आली आहे. चिक्कपडल्ली पोलीस स्थानकात मृत महिलेच्या नातेवाईकांनी या सर्व प्रकाराबाबत तक्रार दाखल केली होती. त्या आधारावर पोलिसांनी गुन्हा नोंद केला होता. दरम्यान चेंगराचेंगरीच्या घटनेंतर अभिनेता अल्लू अर्जुनने या दुर्घटनेबद्दल दिलगिरी व्यक्त केली होती. एक्सवर व्हिडीओ पोस्ट करत त्याने म्हटले, संध्या थिएटरमध्ये घडलेली घटना दुर्दैवी असून यात मृत्युमुखी पडलेल्या महिलेच्या कुटुंबियांप्रती संवेदना व्यक्त करतो. तसेच या कठीण काळात मी त्यांच्याबरोबर आहे. त्यांनी स्वतःला एकाकी समजू नये, मी स्वतः त्यांची भेट घेईल. पुढील खडतर वाटचालीसाठी जी मदत लागेल, ती मी करेन.

### खासदार प्रियांका गांधी यांचे लोकसभेत पहिलेच भाषण

### मणिपूर, संभल व हाथरसवरून टीका

# संविधानाच्या मुद्द्यावर मोदी सरकारवर सडकून टीका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : लोकसभा पोट निवडणुकीत काँग्रेसच्या नेत्या प्रियंका गांधी पहिल्यांदाच खासदार म्हणून संसदेत पोहचल्या आहेत. त्यानंतर आज पहिल्यांदाच प्रियंका गांधी यांनी लोकसभेत भाषण केले. भाषणाच्या सुरूवातीलाच प्रियंका गांधी यांनी १३ डिसेंबर रोजी दहशतवादी हल्ल्यावेळी संसदेच्या सुरक्षा करत असताना शहीद झालेल्या सुरक्षा कर्मचार्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

संसदेतील आपल्या पहिल्याच भाषणात खासदार प्रियंका गांधी यांनी उन्नाव बलात्कार पीडितेच्या वेदना सभागृहासमोर माडल्या. याबरोबरच संविधानाने महिलांना लढण्याची शक्ती दिल्याचेदेखील प्रियांका गांधी म्हणाल्या. प्रियांका गांधी यांनी सांगितलं की, मी उन्नाव येथे बलात्कार पीडितेच्या घरी गेले होते. तिची जाळून हत्या करण्यात आली होती. ती कदाचित २०-२१ वर्षांची असेल. आपल्या सगळ्यांना मुले आहेत. आपण विचार करू शकतो की आपल्या मुलीवर वारंवार बलात्कार झाला आणि जेव्हा ती आपली लढाई लढण्यासाठी गेली तेव्हा तिला जाळून ठार करण्यात आले, तर आपल्याला काय सहन करावे लागत असेल.

मी त्या मुलीच्या वडीलांना भेटले. त्यांची शेती जाळून टाकण्यात आली होती. तिच्या भावांना आणि वडीलांना मारहाण करण्यात आली होती. त्या मुलीच्या वडीलांनी सांगितलं की मुली मला न्याय हवा आहे. माझी मुलगी एफआयआर दाखल करण्यासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी गेली तर तिथे तो करून घेतला गेला नाही. तिला दुसर्या जिल्ह्यात जावे लागले. ती रोज सकाळी सहा वाजता उठून एकटी ट्रेनने दुसर्या जिल्ह्यात जात होती. तिच्या वडीलांनी मला सांगितलं की मी तिला एकटी जाऊ नको म्हणालो, हा लढा सोडून दे. तर तिने मी एकटी जाईन आणि माझी लढाई मी स्वत: लढेन असं तिच्या वडीलांना सांगितलं. ही लढण्याची क्षमता आणि हिंमत त्या आणि देशभरातली कोट्यवधी महिलांना संविधानाने दिली आहे, असे प्रियांका गांधी म्हणाल्या.



प्रियांका गांधी पुढे बोलताना म्हणाल्या की, आपले संविधान एक सुरक्षा कवच आहे जे देशातील लोकांना सुरक्षित ठेवते. वाईट गोष्ट ही आहे की सत्ता पक्षातील सहकारी जे मोठमोठ्या गोष्टी करतात त्यांनी गेल्या १० वर्षात हे सुरक्षा कवच तोडण्याचा पूर्णपणे प्रयत्न केला आहे.

संविधानात सामाजिक आर्थिक आणि राजकीय न्यायाचे वचन आहे. हे वचन एक सुरक्षा कवच आहे.

लॅटरल एंट्री आणि खासगीकरणाच्या माध्यमातून हे सरकार आरक्षण कमकुवत करण्याचे काम करत आहे. जर लोकसभा निवडणुकीत हा निकाल आला नसता तर यांनी संविधान बदलण्याचे काम देखील सुरू केले असते, असेही प्रियांका गांधी त्यांच्या पहिल्या भाषणात बोलताना म्हणाल्या.

आज लोकांची मागणी आहे की जातनिहाय जनगणना झाली पाहिजे, याचा उल्लेख सत्ताधारी पक्ष करत आहेत त्याचे कारण देखील निवडणुकीत आलेले निकाल आहेत असेही प्रियांका गांधी म्हणाल्या.

प्रियांका गांधी यांनी आपल्या संसदेतील पहिल्याच भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली, त्या म्हणाल्या की, पंतप्रधान येथे सभागृहात संविधानाचे पुस्तक डोक्याला लावतात. पण संभल, हाथरस मणिपूर येथे न्यायाची मागणी केली जाते तेव्हा त्यांच्या कपाळावर रेषदेखील दिसत नाही. कदाचित त्यांना समजलेले नाही की भारताचे संविधान संघाचे विधान नाही.

## बार्शी ते जामगाव जाणारे रोडवरील हॉटेल दुरिस्ट रेस्टॉरंट लॉजिंगवर बेकायदेशीर कुंटणखानावर कार्यवाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनीधी : बार्शी ता. बार्शी येथील बार्शी ते जामगाव जाणारे रोडवरील हॉटेल दुरिस्ट लॉजीगवर चालणारे कुंटणखाप्यावर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाने छापा टाकून ०३ पिडीतांची केली मुक्तता

बार्शी ते जामगाव जाणारे रोडवरील हॅाटेल दुरिस्ट रेस्टॉरंट लॉजिंगवर बेकायदेशीर कुंटणखाना चालु असल्याची खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदर बातमी वरून दि.१२/१२/२०२४ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षातील पोलीस निरीक्षक बजरंग साळुंखे व पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार यांनी सदर ठिकाणी छापा टाकण्याकरीता साळा रचून बाशी ते जामगाव जाणारे रोडवरील हॉटेल टूरिस्ट लॉलिंगवर बोगस गि-हाईक पाठवून खात्री करून सदर ठिकाणी छापा टाकण्यात आला.

यातील तीन पिडीत महिला यांना आरोपी नामे १) राजेंद्र भिमराव मराते वय ४८ वर्षे रा. जामगाव ता. बार्शी जि. सोलापूर (लॉज मालक) २) संतोष मच्छिंद्र नलवडे वय ५२ वर्षे रा. तुळजापुर रोड, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर (लॉज मॅनेजर) यांनी हॉटेल दुरिस्ट लॉजीगचा कुंटणखाना प्रमाणे वापर करून ०३ पिडीत महिलांना वेश्याव्यवसायासाठी डांबून ठेवून त्यांचेकडून जबरदस्तीने वेश्याव्यावसाय करून घेवून त्यांचे येणारे कमाईवर स्वतःची उपजिविका करीत असताना मिळून आल्याने सदर आरोपी विरुद्ध मसपोफी सविता कोकणे यांनी बार्शी तालुका पोलीस ठाणे येथे भाग ५ गु.र.नं. ०४०६/२०२४ अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३.४,५,६ सह भारतीय न्याय संहीता कलम १४३(२), १४४(२), ३(५) प्रमाणे फिर्याद देवून गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्हयाचा तपास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे पोलीस निरीक्षक बजरंग साळुंखे हे करीत आहेत. सदर गुन्हयातील आरोपी नामे १) राजेंद्र भिमराव मराठे वय ४८ वर्षे रा. जामगाव ता. बार्शी जि. सोलापूर (लॉज मालक) २) संतोष मच्छिंद्र नलवडे वय ५२ वर्षे रा. तुळजापुर रोड, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर (लॉज मॅनेजर) हे सध्या पोलीस अटकेत असून गुन्हयाचा तपास सुरू आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामीण अतुल कुलकर्णी, मा. अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, मा. पोलीस उपअधिक्षक पोलीस (मुख्या) विजयालक्ष्मी कुर्री यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे पोलीस निरीक्षक बजरंग साळुंखे, पो. उपनिरीक्षक मोरे, पो. उपनिरीक्षक काळे मसपोफी/कोकणे, पोहेकों/४४७ वाकडे, पोहेकरं / ८३२ जाधव, पोहेको १७१६ राठोड, पोहेकों / १७६ वाळके, मपोकों/२२३८ पाटील, चापोकों / १०२३ बोंबिलवार यांनी कामगिरी केलेली आहे.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### अटक व सुटका

तेलुगू सिनेमांमधील सुपरस्टार अभिनेता अल्लू अर्जुन सध्या पुष्पा २: द रुल या चित्रपटामुळे चर्चेत आहे. ४ डिसेंबर रोजी हैदराबाद येथील संध्या थिएटरमध्ये या चित्रपटाचा प्रिमियर शो ठेवण्यात आला होता. यासाठी अल्लू अर्जुन अचानक संध्या थिएटरमध्ये पोहोचल्यामुळे एकच गोंधळ उडाला. चाहत्यांनी त्याला जवळून पाहण्यासाठी धावाधाव केली. त्यामुळे चेंगराचेंगरीची दुर्घटना घडून त्यात ३५ वर्षीय महिला रेवतीचा मृत्यू झाला होता. तसेच तिचा मुलगाही गंभीर जखमी असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान याप्रकरणी अल्लू अर्जूनवर गुन्हा दाखल झाला असून आज त्याला अटकही करण्यात आली. तसेच त्याला १४ दिवसांची कोठडी सुनावल्यानंतर अल्लू अर्जुनने अटकेपासून सुटका मिळविण्यासाठी तेलंगणा उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. दरम्यान आता या प्रकरणी मोठी घडामोड समोर आली आहे. ज्या महिलेचा मृत्यू झाला. त्या महिलेचा पती भास्कर याने माध्यमांशी बोलताना सांगितले की, त्याला अल्लू अर्जुनच्या अटकेची माहिती नाही आणि तो अभिनेत्याच्या विरोधातील सर्व तक्रारी मागे घेण्यास तयार आहे. माध्यमांशी बोलताना भास्करने सांगितले, अल्लू अर्जुनविरोधातील तक्रार मागे घेण्यास मी तयार आहे. चेंगराचेंगरीच्या प्रकरणात अल्लू अर्जुनला अटक झाल्याची मला कल्पना नाही. चेंगराचेंगरीच्या घटनशी अल्लू अर्जुनचा काहीही संबंध नाही. दरम्यान अल्लू अर्जूनविरोधात एफआयआर दाखल झाल्यानंतर हैदराबाद पोलिसांच्या सेंट्रल झोनचे पोलीस उपायुक्त अक्षांश यादव यांनी सांगितले की, भारतीय न्याय संहितेच्या कलम १०५ (सदोष मनुष्यवधासाठी शिक्षा) नुसार अल्लू अर्जुनवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच कलम ११८ (जाणूनबुजून इतरांच इजा पोहोचवणं) याचीही नोंद एफआयआरमध्ये करण्यात आली आहे. चिक्कपडल्ली पोलीस स्थानकात मृत महिलेच्या नातेवाईकांनी या सर्व प्रकाराबाबत तक्रार दाखल केली होती. त्या आधारावर पोलिसांनी गुन्हा नोंद केला होता. दरम्यान चेंगराचेंगरीच्या घटनेंतर अभिनेता अल्लू अर्जुनने या दुर्घटनेबद्दल दिलगिरी व्यक्त केली होती. एक्सवर व्हिडीओ पोस्ट करत त्याने म्हटले, संध्या थिएटरमध्ये घडलेली घटना दुर्दैवी असून यात मृत्युमुखी पडलेल्या महिलेच्या कुटुंबियांप्रती संवेदना व्यक्त करतो. तसेच या कठीण काळात मी त्यांच्याबरोबर आहे. त्यांनी स्वतःला एकाकी समजू नये, मी स्वतः त्यांची भेट घेईल.

# शासकीय कर्मचाऱ्यांना मुख्यालयी न राहण्याची अॅलर्जी!

## कर्मचाऱ्यांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष, सर्वसामान्य नागरिकांनाची अनेक कामे खोळंबली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी/राहुल साबळे : ग्रामीण भागासह शहरात जनतेच्या सेवेसाठी कार्यरत असलेल्या निम शासकीय व शासकीय कार्यालयांना अपडाऊनचे ग्रहण लागले असल्याने नागरिकांना त्यांना मिळणाऱ्या अनेक सेवेपासून वंचित राहावे लागत आहे. शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणारे दस्तावेज वेळेवर मिळावेत यासाठी शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना मुख्यालय रहाणे बंधनकारक असून ते कर्मचारी मात्र आप आपल्या सुविधा नुसार राहतात याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा सध्या नागरिकांमध्ये होत आहे.

बुलढाणा जिल्ह्यामध्ये अनेक ग्रामीण भागासह तालुक्याच्या शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी मुख्यालय राहत नसल्याने नागरिकांची कागदपत्रांसाठी मोठी गैरसोय होत आहे. याबाबत अधिकारी व कर्मचाऱ्यांना काही घेणे देणे उरलेले नाही.ते वेळेनुसार आपल्या कार्यालयात येतात व जातात शहरासह ग्रामीण भागातही प्रशासकीय कार्यालयातून अधिकारी व कर्मचारी यांनी वेळेत कार्यालयात यावे व कार्यालयीन कारभार सुरळीत व्हावा यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांना निवासस्थाने देण्यात आलेली आहेत. मुख्यालय राहिल्यास नागरिकांची कामे वेळेवर होऊन काही समस्या असल्यास त्याबाबत तालुका प्रशासनाला अवगत करता येते पंचायत समिती अंतर्गत ग्राम विस्तार अधिकारी ग्राम सेवक,आरोग्य कर्मचारी,जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक,तलाठी,कृषी विभागाचे कर्मचारी तसेच विद्युत पुरवठा करणारे मुख्य कर्मचारी सुद्धा मुख्यालय राहत नसल्याचे दिसून येते वास्तविक शासनाने अधिकारी कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहण्याचे आदेश देऊन सुद्धा अनेक वर्ष लोटली तरी मात्र त्यांची अमलबजावणी झाली नसल्याचे दिसते याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी देण्याची गरज निर्माण झालेली आहे.

### शासकीय कर्मचारी जिल्ह्याच्या,तालुक्याच्या ठिकाणावरून स्वतःच्या वाहनाने करतात अपडाऊन

तालुक्यासह ग्रामीण भागातले कर्मचारी सुद्धा बुलढाणा, चिखली असे ज्यांच्या त्यांच्या सोयी अनुसार स्वतःच्या अपडाऊन करतात तर काही कर्मचारी एसटी महामंडळाच्या बसने ये जा करतात.बहुतांश कर्मचारी बाहेर गावावरून ये जा करत असल्याने नागरिकांच्या कामाचा खेळ खंडोबा होत आहे. विशेषतः आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या आरोग्य केंद्रातील बहुतांश कर्मचारी मुख्यालयीन राहत नसल्याची सुद्धा नागरिकांमधून ओरड होत असुन ही बाब देखील अतिशय गंभीर असून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन मुख्यालयी राहण्याची आदेश द्यावे अशी मागणी सर्व सामान्य जनतेतून होत आहे.

# चंदुकाका सराफ तर्फे भिमाई आश्रमशाळेत कपडे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : इंदापूर येथील मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्ट अंकित प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळेच्या ४० विद्यार्थ्यांना महाराष्ट्रभर शुद्ध सोन्यासाठी प्रसिद्ध असणाऱ्या आणि १९८ वर्षाची गौरवशाली परंपरा असणाऱ्या चंदूकाका सराफ अँड सन्स् प्रा.लि.बारामती सुवर्णपेढीच्या वतीने गुरुवारी (दि.१२) टी-शर्ट व पॅन्टचे किट वाटप करण्यात आले.






यावेळी सुवर्णपेढीचे मार्केटिंग विभागाचे क्लस्टर हेड धनंजय माने, मार्केटिंग प्रतिनिधी विनोद जगताप, सचिन कांबळे , व गजानन बारगजे यांच्या हस्ते कपड्यांचे किट विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.

यावेळी धनंजय माने यांनी चंदूकाका सराफ या सुवर्णपेढीचे इंदापूर येथे नवीन शाखेचे दि.२४ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता उद्घाटन होणार असून या कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन केले. संस्थेचे सचिव अॅड. समीर मखरे यांनी चंदुकाका सराफ या सुवर्ण पेढीच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम केले जाते म्हणून सुवर्णपेढीचे चेअरमन किशोर कुमार शहा यांचे कौतुक केले तर मुख्याध्यापक साहेबराव पवार यांनी उपस्थितीतांचे आभार मानले.यावेळी विद्यार्थी,शिक्षक,अधीक्षक उपस्थित होते. सदरील उपक्रमासाठी सेल्स हेड श्री दीपक वाबळे मार्केटिंग हेड कुलदीप बावणे व कुमार राठोड यांचे मार्गदर्शन मिळाले.

# डॉ.बाबसाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यासाठी भिमानुयायांचे जेजुरी येथे आंदोलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर/प्रतिनिधी जेजुरी येथील भारतीय संविधानाचे निर्माते महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे काम नवीन जागेत शासनाच्या खर्चाने तात्काळ सुरु करण्यात यावे ,या मागणीसाठी पुरंदर तालुक्यातील शिव शाहू फुले आंबेडकर विचार प्रेमी व पुरंदर तालुक्यातील भिमानुयायांच्या वतीने, जेजुरी नगरपरिषदे समोर गुरुवार दि. १९ / १२ / २०२४ रोजी सकाळी ठीक १०.वाजता जाहीर निदर्शने आंदोलन करण्यात येणार आहे.



या बाबतचे निवेदन आंबेडकरी चळवळीतील नेते,भिमसैनिक विष्णूदादा भोसले यांच्या नेतृत्त्वाखाली, जेजुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगोले व जेजुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक वाघचौरे यांना देण्यात आले, यावेळी जेजुरी नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष अविनाश भालेराव, सासवड नगररिषदेचे बांधकाम समितीचे माजी सभापती सोपानराव रणपिसे, संभाजी ब्रिगेडचे जेजुरी शहर अध्यक्ष संदीप जगताप, सेवानिवृत्त कृषी अधिकारी सुनील जगताप, सामाजिक कार्यकर्ते मनोहरनाना ताथवडकर, रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेड पारधी आघाडीचे पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष पुरुषोत्तम पवार, भटके विमुक्त संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र जावळेकर राज्याचे नेते राजू कुडाळकर, रिपब्लिकन पक्षाचे माजी अध्यक्ष नामदेव नेटके, काँग्रेस पक्षाचे अनुसूचित जाती जमाती सेलचे तालुका अध्यक्ष अनिल कांबळे, सामाजिक कार्यकर्ते तानाजी भालेराव, चक्रधारी सोनवणे, आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते प्रा सदाशिव कांबळे, शाम जगताप, अमोल पवार राजाभाऊ कुदळे , आण्णा शिंदे, सचिन शिंदे, अजय शिंदे, आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते, सदर निवेदनाच्या प्रति मा जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, पुरंदरच्या उपविभागीय अधिकारी तथा प्रांत वर्षा लांडगे, पुरंदरचे तहसिलदार विक्रम राजपूत यांना देण्यात आले आहे.

जेजुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगोले यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा पुरंदर प्रशासनाने कोणालाही विश्वासात न घेता एखादा दगड उचलून टाकावा अशा प्रकारे काढून टाकला आहे. या घटनेला सहा महिने होऊन देखील पुतळ्याचे काम सुरु करण्यात आले नाही, महामानवाच्या पुतळ्याचे काम नवीन जागेत तात्काळ सुरु करण्यात यावे या मागणीसाठी यापूर्वी सासवड येथील ऐतिहासिक शिवतीर्थावर व पुणे येथे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जाहीर निदर्शने आंदोलन करुनही अद्याप जेजुरी नगरपरिषदेने पुतळ्याचे काम सुरु केले नाही, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारण्यास प्रशासन उदासीन दिसून येत आहे, त्यामुळे या झोपी गेलेल्या प्रशासनाला जागे करण्यासाठी, व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे काम तात्काळ सुरु करण्यात यावे या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे, हे आंदोलन कोणत्याही राजकीय पक्ष किंवा संघटनेच्या वतीने, करण्यात येणार नसून, पुरंदर तालुक्यातील शिव शाहू फुले आंबेडकर प्रेमी,व तालुक्यातील भिमानुयायी यांच्या वतीने करण्यात येणार आहे, या आंदोलनास डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक राजकीय धार्मिक चळवळीत काम करणाऱ्या सर्व मान्यवर पदाधिकारी कार्यकर्ते यांनी आंदोलनात सहभाग घ्यावा असे आवाहन भिमसैनिक विष्णूदादा भोसले यांनी केले आहे.

# चारमस ग्रुप पुणे यांचे वतीने मातोश्री वृद्धाश्रमास राज्यस्तरीय कमलकांत पुरस्काराने सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुका गोपाळपूर येथील श्री संत तनपुरे महाराज मातोश्री वृद्धाश्रमास चार्मस ग्रुप पुणे यांच्यातर्फे प्रतिवर्षीप्रमाणे स्वर्गीय डॉक्टर अनार यादव सर (ज्येष्ठ साहित्यिक) यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ देण्यात येणारा कमलकांत पुरस्कार २०२४*हा नुकताच देण्यात आला या पुरस्कारामध्ये रोख रक्कम, शाल श्रीफळ, सन्मानचिन्ह, समावेश असून तो पुरस्कार व्यवस्थापक श्री धनंजय राक्षे यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला



चर्मस ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष मा श्री लक्ष्मीकांत राव पाचारणे साहेब, श्री संत तनपुरे महाराज संस्थेचे विश्वस्त ह.भ.प. अनंत महाराज तनपुरे नायब तहसीलदार मा श्री नागनाथ माळवतकर, राजेश कसबे, सौ. मृणालिनी कसबे, चर्मस ग्रुपचे सर्व सभासद वृद्ध माता-पिता या समयी उपस्थित होते. यावेळी पाचारणे साहेब यांनी उद्धार समाजातील वृद्धांना आनंदी जीवन जगण्याचा संदेश दिला व चार मज ग्रुपच्या माध्यमातून आजपर्यंत २३ सामाजिक संस्थांना कमलकांत पुरस्कार दिला असून २४ वास पुरस्कार देऊन चिकन सूप या पुस्तकाच्या ६१ वी आवृत्ती ची भेट दिल्या, त्यानंतर मा. नागनाथ माळवतकर यांनी आपले मत व्यक्त केले. सौ मृणालिनी कसबे यांचा वाढदिवस वृद्धाश्रमाचे उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी संस्थेची विश्वासता ह.भ.प. अनंत महाराज तनपुरे यांनी वृद्धाश्रम २००१ पासून शासनाच्या मदतीविना संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. बद्रीनाथ महाराज तनपुरे व समाजातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने चालवीत आहेत असे नमूद केले चार्मस ग्रुप असलेले हे कार्य सामाजिक संस्थांना प्रोत्साहन देणारे असल्याचे सांगितले. कार्यक्रमाची सांगता व्यवस्थापक धनंजय राक्षे यांनी बुद्धा शर्मा विषयी माहिती सांगून आभार मानून व्यक्त केले.

# छत्तीस वर्षांनी दिला जुन्या आठवणींना उजाळा, माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सैनिक टाकळी प्रतिनिधी/संजय चव्हाण : बालपणापासून आपल्याकडून मुलांमधील भावनिक अंतर कमी केले नसले पाहिजे.यासाठीआपल्या बालकात काय दडले आहे हे शोधणे गरजेचे असल्याचे मत प्रसिद्ध मानसोपचार तज्ञ डॉक्टर रुपेश पाटकर यांनी व्यक्त केले.ते येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल मधील १९८८ मधील १० वी च्या माजी विद्यार्थी स्नेह संमेलनात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक विनोद पाटील तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे अध्यक्ष एस .के. पाटील यांची उपस्थिती होती. यावेळी डॉक्टर पाटकर पुढे बोलताना म्हणाले धावपळीच्या युगात पन्नाशीनंतर प्रत्येकाने आपल्या आरोग्याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले पाहिजे. यासाठी व्यायाम , योगा, ध्यान चा वापर दैनंदिन जीवनात करावा असे आवाहन त्यांनी केले. यावेळी बोलताना मुख्याध्यापक विनोद पाटील यांनी माजी विद्यार्थ्या , स्वंयसेवी संस्था , समाज सेवक , दानशूर व्यक्तीं ओलयांच्या माध्यमातून शाळेचा भौतिक विकास झाला असल्याचे सांगितले. दरम्यान या बॅच च्या माजी विद्यार्थ्यांनी ३६ वर्षांनी एकत्र येत जुन्या आठवणींना उजाळा देताना शाळेची घंटा, हजेरी, राष्ट्रगीत, प्रार्थना या शालेय जीवनातील गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव आपल्या शिक्षकां सोबत यानिमित्ताने घेतला . यावेळी आर. डी .पाटील ए.ए.इंगवले,ए.बी.गायकवाड, .ए एच खराडे यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांच्या त्या काळातील सोबतच्या आठवणींना उजाळा दिला.यावेळी उपस्थित गुरुजनांचा सत्कार माजी विद्यार्थ्यांच्या मार्फत करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांच्या कडून शाळेसाठी देणगी सुपुर्द करण्यात आली. कार्यक्रमास ए. एच. पाटील, टी. एम. गायकवाड, माजी शिक्षिका काटकर एस.डी. के.व्ही.महात्मे,पी.जी.पाटील ,उदय पाटील या शिक्षकांसह ए.के.शिंदे,ए.एम.बिरणगे,के. जे.घेवडे उपस्थित होते.यावेळी सर्व माजी विद्यार्थ्यांनी शिक्षकासोबत

स्नेह भोजनाचा आस्वाद घेतला शेवटी विरंगुळा म्हणून सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. एकमेकांच्या जिव्हाळ्याचा स्नेह मेळावा उत्साहात संपन्न झाला.

# भावी पिढीसाठी पाण्याचे संवर्धन ही काळाची गरज आहे : कर्नल शशिकांत दळवी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/प्रतिनीधी : मराठवाड्यामध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न वरचेवर गंभीर होत चाललेला आहे. धाराशिव जिल्ह्यामध्ये विशेषतः कळंब तालुक्यातील ३१ गावांमध्ये रूपटॉप रेन वॉटर हार्वेस्टिंग हा प्रकल्प यशस्वी राबविला गेला आहे .त्यामुळे पुढील काळात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न नक्कीच सुटेल हा प्रश्न सोडविण्यासाठी आयसीआयसीआय बँकेने अर्थसहाय्य केले असून कळंब तालुक्यातील ३१ गावात शासकिय इमारती शाळा, मंदिर, ग्राम पंचायत, वाचनालय, सभागृह, सह जवळपास एक हजार सत्तावीस ठिकाणी हे रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम बसविलेली आहे . म्हणजे ९.३५ लाख चौ.फूट छतावर प्रत्येक वर्षी पडणारे जवळपास ३.७२ करोड लिटर पावसाचे पाणी तेथील ६२० बोअरवेल आणि ६१ विहिरी मधून व १०९७ घरावरील लावण्यात आलेल्या रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम ने भुजलात सोडले जाईल यामुळे ही ३१ गावाचा पाण्याचा प्रश्न सुटेल अशी माहिती श्री कर्नल शशिकांत दळवी साहेब यांनी दिली आहे. भावी पिढीसाठी पाण्याचे संवर्धन ही काळाची गरज आहे त्या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्वाचा आहे असे मत सेवानिवृत्त कर्नल शशीकांत दळवी यांनी व्यक्त केले आहे.




कळंब तालुक्यातील वडगाव जहागीर येथे रेन वॉटर हार्वेस्टिंग या प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला यावेळी ते बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुंढे होते. यावेळी आयसीआय सीआय बँकेचे असिस्टंट जनरल मॅनेजर श्री शैलेश झा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. परिवर्तन सामाजिक संस्था नळदुर्ग ता. तुळजापूर, मॅप्स इंडस्ट्रीज( ई) प्रा. लि. पुणे व पर्जन्य कन्सल्टन्सी पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली व आयसीआयसीआय बँकेच्या अर्थसहाय्याने हा प्रकल्प राबविण्यात आला आहे. या कार्यक्रमास गावातील नागरिक , शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. या वेळी शैलेश झा, राजू तेली, यांची भाषणे झाली. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक परिवर्तनचे सचिव मारुती बनसोडे यांनी केले तर सूत्र संचलन लालासाहेब यांनी केले आणि आभार प्रदर्शन संजय जाधव यांनी केले

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358


This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### ह.भ.प.रंगनाथ महाराज परभणीकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन

लोहा,(प्रतिनिधी) : श्री संत ब्र. मु. ह. भ. प. रंगनाथ महाराज परभणीकर (गुरुजी) यांच्या पुण्यतिथीनिमित्त लोहा शहरात भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. स्वानंद सुख निवासी वेदांत केसरी श्री



संत ब्र. मु. ह. भ. प. रंगनाथ महाराज परभणीकर (गुरुजी) यांच्या पुण्यतिथीनिमित्त आर्य वैश्य समाज लोहा यांच्या वतीने दि.१९ डिसेंबर २०२४ रोजी गुरुवारी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ पर्यंत नगरेश्वर मंदिर लोहा येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आयोजकांच्या वतीने देण्यात आली.

### एका इसमाचा मृत्यू

सोलापूर : घरी झोपले असताना नातेवाईकांनी उठवण्याचा प्रयत्न केला. मात्र तो उठत नसल्याने समशान जेम्स देवनूर (वय ४९, रा. सिद्धेश्वर पेठ) याला बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले असता उपचारापूर्वीच मयत झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# परभणी येथील संविधानच्या विटंबना करणाऱ्या आरोपीवर कडक कारवाई करण्यात यावे : अविनाश मडिखांबे

## अक्कलकोट तहसीलदारांना दिले निवेदन; रिपाइंच्या अविनाश मडीखांबे यांची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : परभणी येथे भारतीय राज्य घटणेचे शिल्पकार विश्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळील संविधान प्रतिक्रुतीचा अवमान करणाऱ्या समाजविघातक जा-तीवादी औलादिवर कठोर कारवाई करावी तसेच या प्रकरणाची तातडीने सखोल चौकशी करून यामागील सूत्रधाराचा शोध लावून त्याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी अविनाश मडिखांबे यांनी अक्कलकोटचे तहसिलदार विनायक मगर यांना रिपाइं कडून मागणी केली आहे.

परभणीत भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार विश्वरत्न भारतरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याजवळील संविधानाच्या प्रतिकृतीचा झालेला अवमान निषेधार्ह असुन संविधानचा अवमान आम्ही खपवून घेणार नाही. संविधानाचा अवमान करण्याऱ्या आरोपीवर कठोर कारवाई करावी.

या प्रकरणाची तातडीने सखोल चौकशी करून या मागील सुत्रधार शोधून त्याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा.

अशी मागणी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले भारत सरकार यांच्या आदेशानुसार व महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या मार्गदर्शनाखाली आरपीआय आठवले अक्कलकोट तालुका यांच्या वतीने अक्कलकोट तालुकाध्यक्ष अविनाश मडिखांबे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राचे विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या कडे करीत आहोत.

परभणी शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळा परिसरात संविधानाची प्रतिकृती काढुन संविधानाचा अवमान करणे हि अत्यंत गंभीर घटना आहे. महाराष्ट्रातील नव्हे तर भारत देशातील आंबेडकरी जनतेच्या भावना संताप जनक तीव्र झाल्या आहेत.सदरील निवेदनाची गांभीर्यपुर्वक दखल घेऊन सुत्रधार व आरोपीवर राष्ट्रदोहाचा गुन्हा दाखल करावा अन्यथा तीव्र स्वरुपाचे आंदोलन छेडले जाईल.आशा मागणीचे निवेदन तहसिलदार अक्कलकोट यांच्यामार्फत पाठवित आहोत याची गांभीर्याने दखल घ्यावी असे मागणीचे निवेदन तहसिलदार विनायक मगर यांना देण्यात आले आहे.




यावेळी रिपाइं आठवले अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे,जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी,रिपाइं सोलापूर जिल्हा युवक आघाडी सरचिटणीस विजयकुमार पोतेनवरू, रिपाइं आठवले अक्कलकोट शहर अध्यक्ष अजय मुकणार,शहार सरचिटणीस शुभम मडिखांबे,शहर उपाध्यक्ष सुरेश सोनकांबळे,सुरेश गायकवाड,शहर संघटन सचिव अंबादास शिंगे,तालुका सरचिटणीस राजु भगळे, युवक तालुका सरचिटणीस तमा धसाडे,तालुका कोशाध्यक्ष अंबादास गायकवाड,विलास गायकवाड,तालुका उपाध्यक्ष प्रकाश गडगडे, यमनाप्पा शिंगे, शरणु बनसोडे, सुरज सोनके, शिवानंद धोडमनी, कटय्याप्पा मणुरे, आदेवाडी सरपंच रमेश दोडमनी, संगोळगी सरपंच बसवराज निम्मे, गवळी, दत्ता मडिखांबे, भारत सोनकांबळे, विजकुमार बाळशंकर, रोमित मडिखांबे, नितेश मडिखांबे, विजय मडिखांबे, नागेश मडिखांबे, विक्रम सोनकांबळे, अजय मडिखांबे, तानाजी मडिखांबे, दुधनी शहर अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी, महेदिमिंया जिडगे, लक्ष्मण निंबाळ, उमेश शिवशरण, सुनिल मनिकडे, राजु गायकवाड, महीबुब शेख, नागेश मडिखांबे, आशीष दांगोलिकर, राजु शिंदे निगप्पा निबळसह इतर पदाधिकारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## वंचित बहुजन आघाडी अक्कलकोटच्या वतीने परभणी येथील संविधान विटंबनेच्या निषेधार्थ तहसीलदारांना निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : परभणी जिल्ह्यात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या शेजारी असलेल्या संविधान शिल्पाची काही जातीयवादी समाजकंटकांडून तोडफोड करून विटंबना करण्यात आली होती परभणी येथील कार्यकर्त्यांनी एका आरोपीस पकडून प्रशासनाच्या हवाली दिल्यानंतर त्या घटनेच्या निषेधार्थ परभणी जिल्हा बंद च्या संदर्भात आंबेडकर अनुयायी व संविधान प्रेमीच्या वतीने मोठ्या प्रमाणात भव्य मोर्चा निघाला आणि सदर संविधान शिल्प फोडणाऱ्या व्यक्तीच्या पाठीमागे षडयंत्र रचनारा सूत्रधार कोण आहे त्याला अटक करा अशा प्रकारची मागणी परभणीतल्या समुदायाच्या वतीने करण्यात आला आहे. वंचित बहुजन आघाडी अक्कलकोटच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन देऊ कडक कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली.

परभणीतील आंबेडकरी जनतेवर खोटा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे तो काढून घेण्यात यावा, संविधान शिल्प



तोडण्यात आलेला आहे याचा केस फास्टट्रॅक कोर्टामध्ये चालावावा या पाठीमागे जे कोणी षडयंत्र रचलेला आहे त्या सूत्रधाराला सुद्धा त्वरित अटक करण्यात यावी व त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशा मागणीचे निवेदन वंचित बहुजन आघाडी अक्कलकोट च्या वतीने मा. तहसीलदार साहेब यांना देण्यात आला.

यापसंगी युवक तालुकाध्यक्ष शिलामणी बनसोडे,कामगार आघाडी तालुकाध्यक्ष सिद्धार्थ बनसोडे, शहराध्यक्ष विशाल ठोंबरे,सम्यक विध्यार्थी आंदोलन राज्य प्रवक्ता रवि पोटे,युवक शहराध्यक्ष संदिप बाळशंकर,तालुका संघटक शाम बनसोडे,युवक शहर उपाध्यक्ष शौकत मुजावर, युवक तालुका संघटक दशरथ खंदारे, शहर उपाध्यक्ष शिवाजी चौगुले,सम्यकचे गंगाराम वाघमारे,आदीसह पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

## परभणीच्या घटनेच्या निषेधार्थ सोलापूर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी)-परभणी जिल्ह्यात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या शेजारी असलेल्या संविधान शिल्पाची काही जातीयवादी समाजकंटकांनी तोडफोड करण्यात आली होती,, परभणीच्या कार्यकर्त्यांनी त्या आरोपीस पकडून प्रशासनाच्या हवाली दिल्यानंतर त्या घटनेच्या निषेधार्थ परभणी जिल्हाच्या वतीने मोठ्या प्रमाणात मोर्चा निघाला आणि सदर संविधानशील फोडणाऱ्या व्यक्तीच्या पाठीमागे षडयंत्र करणारा कोण आहे त्याला अटक करा अशा पद्धतीची मागणी तिथल्या समुदायाची आहे.

सोलापूर वंचित बहुजन आघाडी शहर व जिल्हाच्या वतीने आंबेडकरी जनतेवर खोटा गुन्हा दाखल केला तो तुरंत वापस करून घ्यावा,, संविधान शिल्प तोडणार याचा केस फास्टट्रॅक कोर्टामध्ये चालावा,, या पाठीमागे जे कोणी षडयंत्र रचलेला आहे त्याला सुद्धा तुरंत अटक करावा अशा पद्धतीच्या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडी सोलापूर



जिल्हा अध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी श्री कुमार आशीर्वाद यांना निवेदन देण्यात आला.

यापसंगी शहराध्यक्ष प्रशांत गोणेवार जिल्हा महासचिव अनिरुद्ध वाघमारे शहर सचिव विनोद इंगळे,, उत्तर तालुका अध्यक्ष जालिंदर चंदनशिवे, दक्षिण तालुका अध्यक्ष सुरेश देशमुख, दक्षिण युवक आघाडी तालुकाध्यक्ष अमर दुरके, सोलापूर लोकसभा उमेदवार आतिश भैय्या बनसोडे, विधानसभा मध्ये चे उमेदवार श्रीनिवास संगे पाग, महिला शहराध्यक्ष सुरवसे ताई, महासचिव गायकवाड ताई, कामगार संघटनेचे जिल्हा महासचिव सुरज आरकराव,, भारिपचे माजी जिल्हाध्यक्ष विजय गायकवाड,, यशवंत शेठ इंगळे उत्तरचे महासचिव सोनावणे, राजकुमार इंगळे, कृष्णा इंगळे यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते




## बाल लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी शिक्षकांनी योगदान द्यावे

### कल्याणशेट्टी महाविद्यालयात निर्भया पथकाचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट /प्रतिनिधी : विकृत प्रवृत्ती, बाल लैंगिक अत्याचार करत आहेत त्यामुळे समाजाची घडी विस्कटली आहे, अशा स्थितीत शिक्षकांनी प्रबोधनाची भूमिका घ्यावी असे मत निर्भय पथकातील पोलीस अधिकारी ज्योती गाजरे यांनी व्यक्त केले. महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेच्या मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील अँटी रॅगिंग समितीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी संस्थेचे ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी हे होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.

पुढे बोलताना ज्योती गाजरे म्हणाल्या की, पॉक्सो कायदाची अंमलबजावणी जलद गतीने होत आहे परंतु काही समाजद्रोही व्यक्तींना या कायद्याची भीती वाटत नाही. राजरोसपणे ते लहान मुलींवर अत्याचार करत आहे, अशा प्रवृत्तींच्या व्यक्तींचे प्रबोधन शिक्षकांनी केले पाहिजे. व्यापक चळवळ उभारून समाजापर्यंत पोहोचले पाहिजे, लैंगिक अत्याचार करणाऱ्या व्यक्तींवर जरब निर्माण व्हावी म्हणून पॉक्सो कायद्यातील तरतुदी सांगितल्या पाहिजेत. विद्यार्थ्यांना देखील कायदा समजून सांगितला पाहिजे.

सना मियावाले म्हणाल्या की, शिक्षकांनी विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाची माहिती देताना त्याचा दुरुपयोग करू नका असा सल्ला दिला पाहिजे. इंस्टाग्राम, फेसबुक, व्हाट्सअप व गुगलचा वापर ज्ञान घेण्यासाठी झाला पाहिजे, परंतु त्याचा दुरुपयोग होताना दिसत आहे. हे होऊ नये यासाठी शिक्षकानी पुढाकार घेतला पाहिजे. मल्लिनाथ कल्याणशेट्टी म्हणाले की, समाजाची स्थिती विकोपाला गेली आहे. दैनंदिन जीवन जगत असताना दररोज नवीन गुन्हेगारीचे स्वरूप समाजासमोर येत आहे. बाल लैंगिक गुन्हेगारी वाढत आहे. त्यावर प्रबोधन हा एकमेव उपाय आहे ते सर्वांनीच केले पाहिजे. प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले, सूत्रसंचलन प्राध्यापिका शितल झिंगाडे भस्मे यांनी केले तर आभार मनीषा शिंदे यांनी मानले. प्राध्यापिका शिल्पा धूम शेट्टी, शितल फुटाणे, जनाबाई चौधरी, महेश जोगदे यांच्यासह विद्यार्थिनी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> **पॉक्सो कायदा पुस्तिका नियमावलीचे अध्ययन करावे**
>
> **पॉक्सो कायदा पुस्तिका मध्ये सविस्तर बाल लैंगिक गुन्हे कायद्याचे विश्लेषण केले आहे. त्याचे अध्ययन शिक्षकांनी केले पाहिजे तसेच विद्यार्थ्यांना देखील कायद्याचे ज्ञान दिले पाहिजे असे निर्भय पथकाने सांगितले.**

**'एक थैला एक थाली' उपक्रमात देवस्थानचा सहभाग**

**प्रयागराज येथील महाकुंभमेळ्यासाठी वटवृक्ष देवस्थानच्या वतीने १०० स्टील ताटांची व कापडी पिशव्यांची मदत**

# कुंभमेळा हा भारतीय हिंदू संस्कृतीचा महामेळावा : महेश इंगळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : द्वापार युगापासून साधुसंत यांच्या जीवन कार्यास भारतीय संस्कृतीत विशेष महत्त्व आहे. अशा या महान साधुसंतांचा दर १२ वर्षांनी होणारा महाकुंभमेळा यंदा १४४ वर्षानंतर उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे मकर संक्रांती पासून महाशिवरात्री अखेर संपन्न होणार आहे.

या महाकुंभमेळ्यास देशाच्या कानाकोपऱ्यातील साधुसंतांसह जगभरातील ४० कोटीहून अधिक भाविक भेट देण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर अनेक वर्षांपासून परंपरागत चालत आलेला हा कुंभमेळा म्हणजे भारतीय हिंदू संस्कृतीचा महामेळावा असल्याचे प्रतिपादन येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांनी केले.

या महाकुंभमेळ्यात सहभागी होणाऱ्या साधुसंतांना भोजनासाठी लागणाऱ्या ताटांची गरज लक्षात घेऊन येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या वतीने अक्कलकोट पर्यावरण गतिविधिच्या 'एक थैला एक थाली' या उपक्रमीय आव्हानास स्वामी प्रसादाचा हातभार म्हणून १०० स्टील ताटांची व १०० स्वामी कृपेच्या कापडी पिशव्यांची मदत देवस्थान कडून करण्यात आली. यापसंगी महेश इंगळे बोलत होते.

या आध्यात्मिक महाकुंभमेळा सोहळ्यास अक्कलकोट पर्यावरण धार्मिक गती विधीचे प्रमुख महेश वागदरे यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत ही मदत मंदिर समितीचे अध्यक्ष महेश इंगळे यांच्या हस्ते संबंधितांकडे सुपूर्द करण्यात आली.



यापसंगी बोलताना पर्यावरण गती विधीचे प्रमुख महेश वागदरे यांनी आज पर्यंत संपन्न झालेल्या कुंभमेळ्यांमध्ये भाविक व साधुसंतांना जेवण देताना प्लॅस्टिक व थर्माकोलच्या ताटांचा वापर होत असे यामुळे सुमारे १२०० टन कचरा निर्माण होऊन प्रदूषण निर्माण व्हायचे.

ही बाब लक्षात घेऊन पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये याकरिता प्लॅस्टिक व कचरा मुक्त यंदाचा कुंभमेळा संपन्न व्हावा या राष्ट्रीय पातळीवरील पर्यावरण गतिविधिच्या आव्हानास प्रतिसाद देऊन आम्ही अक्कलकोट पर्यावरण गतीविधीच्या माध्यमातून स्टीलचे ताट संकलन करून पाठवण्याचा निर्धार केलेला आहे.

त्यास आमचे लाडके व्यक्तिमत्व असलेले मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी स्वामींचा प्रसाद म्हणून स्टील ताटांची मदत करून आम्हास उपकृत केलेले आहे, त्यामुळे अक्कलकोट पर्यावरण गतीविधी समिती त्यांचे विशेष आभारी असल्याचे मनोगत व्यक्त केले.

यापसंगी सोलापूर जिल्हा पर्यावरण धार्मिक मंडळ सदस्य महेश वागदरे, ग्राम विकास जिल्हा मंडळ सदस्य संदीप कटकधोंड, मल्लामा पसारे मॅडम, सुशील हिरस्कर (पर्यावरण समिती पालक), तम्मा शेळके (अक्कलकोट छत्रपती शिवाजी महाराज समिती संस्थापक अध्यक्ष), आनंद खजूरगीकर सर (निसर्ग फाउंडेशन तालुका पर्यावरण संयोजक), सुनील बिराजदार व सहआयोजक विद्याधर गुरव, देवरमनी सर, लोकापूरे, ऋषिकेश लोणारी, प्रा.शिवशरण अचलेर, श्रीशैल गवंडी, विपुल जाधव, महेश काटकर, गिरीश पवार, प्रसाद सोनार, तुषार मोरे इत्यादी उपस्थित होते.

# आमदार अभिजीत पाटील यांच्या पुढाकाराने मतदार संघातील रेल्वेचे सर्व प्रश्न सुटणार

## आमदार पाटील यांची रेल्वे अधिकाऱ्यांबरोबर महत्त्वपूर्ण बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी

माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांनी विधानसभा सदस्य पदाची शपथ घेतल्यानंतर स्वराज्याची राजधानी रायगड येथे छत्रपतींच्या गादी समोर नतमस्तक झाले होते. यावेळी त्यांनी माढा मतदारसंघात परिवर्तनाची सुरुवात छत्रपतींचे स्मारकाने होणार असल्याचे जाहीर करून माढा मतदारसंघाच्या विकासाचा संकल्प केला होता.

अल्पावधीतच कर्तव्यदक्ष आमदार म्हणून ओळखले जाणारे अभिजीत पाटील यांनी शुक्रवारी कुर्डूवाडी येथे वार्षिक स्टेशन इन्स्पेक्शन संदर्भात आलेले मध्य रेल्वेचे जनरल मॅनेजर धर्मवीर मीना यांची भेट घेऊन मतदार संघातील विविध ठिकाणी रेल्वे सुविधेबाबत सविस्तर चर्चा करून जनहिताच्या मागण्या मांडल्या. यावर रेल्वे अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने लवकरच मतदार संघातील रेल्वे बाबतच्या सर्व सुविधा नागरिकांना मिळणार आहेत.

याप्रसंगी रेल्वे अधिकाऱ्यांसोबत झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत माढा विधानसभेचे आमदार पाटील यांनी मतदार संघातील मोडनिंब येथे कार्गो टर्मिनल बाबत सविस्तर चर्चा केली. या कामाची अंतिम टप्प्यातील प्रक्रिया वेगाने सुरू आहे. हे काम पूर्ण करावे. यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा माल कमी वेळेत आणि कमी खर्चात बाजारपेठेपर्यंत पोहोचविण्यास सहकार्य होईल असा विश्वास दिला.

**अधिकाऱ्यांसोबत केला रेल्वेचा प्रवास आणि सांगितल्या महत्वपूर्ण त्रुटी**

यावेळी त्यांनी माढा - वडशिंगे महातपूर उड्डाणपुलाबाबत मागणी केली. त्यातील दोन पूल बांधणी बाबत मान्यता मिळाली असून व एकाचे सर्वेक्षण करण्याचे आश्वासन रेल्वे अधिकाऱ्यांनी दिले.

तसेच माढा रेल्वे सुशोभीकरण करण्याबाबत तसेच स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, प्रतीक्षालय (वेटिंग रूम) अशा सर्व सुविधा करण्याची मागणी केली. याचबरोबर पंढरपूर - मुंबई आठवड्यातून तीन वेळा रेल्वे आहे, ती रोज सुरू करावी अशी मागणी केली. प्रत्येक शनिवार रविवार मुंबई ते पंढरपूर - टू टायर -थ्री टायर डबे वाढवावे, अशी मागणी केली.

माढा रेल्वे स्टेशनवर कोरोना काळाच्या आधी सर्व रेल्वे गाड्या थांबत होत्या, परंतु आता फक्त दोनच गाड्या थांबतात. पूर्वीप्रमाणे सर्व गाड्या थांबल्यास सर्व प्रवाशांची सोय होईल. याबाबत सविस्तर चर्चा करून मागणी करण्यात केली.

**मोडनिंब कार्गो टर्मिनल, रेल्वे उड्डाणपूल,माढा रेल्वे सुशोभीकरण, पंढरपूर-मुंबई दररोज रेल्वेची सुविधा, याचबरोबर सांगोला येथे कृषी रेल सुरू करण्याची मागणी आ.अभिजीत पाटील यांनी केली.**



कोरोना काळाच्या आधी सांगोला येथे कृषी रेल्वे सुरू होती व ती आता बंद आहे ती पुन्हा सुरू करावी, रेल्वे परिसरातील सर्व जागा विकसित करण्याबाबत सकारात्मक चर्चा केली.

सर्व मागण्यांबाबत अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

याबाबत माध्यमांशी बोलताना आमदार अभिजीत पाटील म्हणाले की; रेल्वेच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या मतदार संघातील विविध ठिकाणी रेल्वे सुविधेबाबत सविस्तर चर्चा करून जनहिताच्या मागण्या मांडल्या. या बैठकीत रेल्वे विभागाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. पुढील काळात रेल्वे विभागाच्या सहकार्याने प्रवाशांना आणि विशेषकरून शेतकरी बांधवांना विशेष लाभ होणार असल्याचे सांगत सर्व मागण्या पूर्ण होईपर्यंत पाठपुरावा करणार असल्याचा विश्वास मतदार संघातील नागरिकांना दिला.

## थोडक्यात...



### श्री क्षेत्र कानिफनाथ गडावर रविवारी श्री दत्त जयंती ऊत्सव सोहळा

पुरंदर : नवनाथ देवस्थान पंच कमिटी ट्रस्ट बोपगाव,व समस्त ग्रामस्थ बोपगांव यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे रविवार दिनांक १५/ १२/ २०२४ रोजी कानिफनाथ गडावर विविध कार्यक्रमाचे आयोजन, पहाटे४ ते ७यावेळी अभिषेक करण्यात येईल. त्यानंतर काकडा होईल. ह. भ. प.गुरुमुर्ती चैतन्य महाराज शिंदे (लोणी काळभोर) यांचे १०ते १२ या वेळेत कीर्तन होईल. १२ते १यावेळेस पालखी मिरवणूक होईल, १. ते ३. या वेळेत चांबळी व वडकी ग्रामस्थांच्या वतीने सर्व भाविकांसाठी महाप्रसाद होईल. असे नवनाथ देवस्थान ट्रस्ट बोपगांव च्या वतीने सांगण्यात आले.

### अशासकीय वाहन चालकपदासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात भरती

सोलापूर (जिमाका) : सोलापूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात अशासकीय वाहन चालक एक पद भरावयाचे आहे. जिल्हयातील पात्र माजी सैनिकांनी सैनिक सेवेची व इतर शैक्षणिक कागदपत्रासह बुधवार दिनांक १८ डिसेंबर २०२४ रोजी प्रत्यक्ष जिल्हा सैनिक कार्यालयात सादर करावेत असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, यांनी केले आहे.

सदर पदाकरिता त्याच दिवशी मुलाखती घेण्यात येणार असल्याने उमेदवारांनी स्वतः ची मुळ कागदपत्रे सोबत आणावीत. या पदाकरीता उमेदवारास चार चाकी वाहन चालविण्याचा परवाना व अनुभव असणे आवश्यक आहे. हे पद फक्त माजी सैनिक संवर्गातून भरण्यात येणार आहे. तसेच सदर पदाकरीता सैन्यातील वाहन चालक संवर्गातील माजी सैनिकास प्राधान्य देण्यात येईल. तरी जिल्यातील माजी सैनिकांनी याचा लाभ घ्यावा असे अवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

### गळफास घेतलेल्या तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू

सोलापूर : वैराग येथील अभिजीत रामभाऊ पतंगे (वय ३१, रा. वैराग, ता. बार्शी) यांनी दहा डिसेंबर रोजी अज्ञात कारणावरून कापडी रेबीनच्या साह्याने लोखंडी अँगलला गळफास घेण्याचा प्रयत्न केला होता. त्याला उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले होते. मात्र त्याच्यावर उपचार सुरू असताना त्याचा १३ नोव्हेंबर रोजी दीड वाजण्याच्या सुमारास मृत्यू झाला. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## परभणी येथील आंबेडकरी आंदोलकांवरील गुन्हे त्वरित मागे घेण्यात यावे : मैत्री ग्रुपची मुख्यमंत्री यांच्याकडे मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
**सोलापूर/ प्रतिनिधी**



परभणी येथील संविधानाची विटंबना झाल्याच्या निषेधार्थ आंदोलन करणाऱ्या आंबेडकरी आंदोलकांवर पोलिसांनी दाखल केलेले गुन्हे त्वरित मागे घेण्यात यावेत, अशी मागणी सोलापूर येथील मैत्री ग्रुपच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ई मेल पाठवुन करण्यात आली आहे.

दि.१० डिसेंबर २०२४ रोजी परभणी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यासमोर असलेल्या भारतीय संविधानाच्या शिल्पाची जातीयवादी आणि नपुसंक लोकांनी नासधूस करुन त्याची विटंबना करण्यात आली होती, यानंतर आंबेडकरी जनतेनी आणि समाजातील तरुण वर्गाने उत्स्फूर्त पणे या भ्याड कृत्याचा जाहिर निषेध करत आदोलन केले होते, हे आंदोलन करत असताना पोलीसांनी आंदोलकांवर कोंबिंग ऑपरेशन ची कारवाई करत खोटे गून्हे दाखल केले आहेत. हे खोटे गुन्हे तातडीने मागे घेण्यात यावेत, अन्यथा राज्यभर यां प्रश्नावर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा मैत्री ग्रुप च्या वतीने युवा उद्योजक आणि रावण साम्राज्य सामाजिक संस्थेचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष सुयश गायकवाड यांनी दिला आहे.

मुख्यमंत्री यांना पाठवलेल्या ई मेल निवेदनात परभणी येथे भारतीय संविधानाच्या प्रतिमेच्या शिल्पाची करण्यात आलेल्या विटंबनेचा ही निषेध करण्यात आला आहे.

संविधानाच्या झालेल्या विटंबने च्या निषधार्थ जे आंदोलक रस्त्यावर उतरले होते, त्यांच्यावर जे खोटे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत तसेच कोंबिग ऑपरेशन च्या नावाखाली आंबेडकरी युवकांची व महिलांची जी धरपकड करण्यात आली आहे ती चुकीची असुन सर्व आंबेडकरी आंदोलकाना विना अट सोडुन देण्यात यावे अशीही मागणी मैत्री ग्रुप च्या वतीने सुयश गायकवाड यांनी केली आहे. सद्या परभणी येथे आंबेडकरी युवकांची महिलांची आणि चळवळीतील व्यक्तींची जी अटक मोहीम पोलीसांनी सुरु केली आहेत ती त्वरीत बंद करण्यात यावी अन्यथा परभणी येथे येऊन आंदोलन येईल असा इशारा ही सुयश गायकवाड यांनी दिला आहे.

परभणी येथील आंबेडकरी आंदोलकांवरील गुन्हे त्वरित मागे घेण्यात यावे ही आमची प्रमूख मागणी असुन जाणुन बुजुन जर पोलिस आंबेडकरी तरुण मुले आणि महिला वर्गाला टार्गेट करुन गुन्हे दाखल करत असतील तर हे आंबेडकरी जनतेवर होणारा मोठा अन्याय्य आहेः चळवळीतील गुन्हे हे गंभीर म्हणुन दखल घ्यायचे नसतात परंतु पोलिस यंत्रणा कोंबिर ऑपरेशन च्या नावाखाली समाजाला छळत असेल तर हे आम्हीं कदापि सहन करणार नाही आणि खपवून ही घेणार नाही.
**सुयश गायकवाड (संस्थापक सदस्य मैत्री ग्रुप, सोलापूर,)**

आंबेडकरी चळवळीमधील व्यक्तींचे अटक सत्र त्वरित थांबवावे आंदोलकांवरील गुन्हे त्वरीत मागे घेतले जावेत आंबेडकरी वस्त्यांमध्ये चालविलेले कोंबींग ऑपरेशन ची कारवाई त्वरीत बंद करण्यात यावी. आणि संविधानाच्या प्रतीमेची तोडफोड करून विटंबना करणाऱ्या जातीयवादी लोकांवर देश द्रोहाचे गुन्हे दाखल करुन तात्काळ अटक करण्यात यावी अन्यथा राज्यभरात या प्रश्नांवर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा ही सुयश गायकवाड यांनी दिला आहे.

या प्रकरणातील जो आरोपी सापडलेला आहे, तो बागायती शेतकरी व सुशिक्षित आहे तरीसुध्दा त्याच्या पाठीमागील शक्तीला लपविण्यासाठी पोलिस खात्याने त्या आरोपीला माथेफिरु, मनोरुग्ण संबोधून सर्व तपास गुंडाळण्याचा प्रयत्न करीत आहेत. या विटंबना पाठीमागची खरी माहिती उघड करण्यासाठी या आरोपीवर रिमांड काढून त्याच्याकडून खरी माहिती काढून हस्तगत करुन संबंधितावर त्वरीत कारवाई करण्यात यावी अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे...

## निफाड येथील उंच कमानीवर जाऊन बसलेल्या तरुणास खाली घेण्यात पोलीसांना आले यश





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड नजिक असणाऱ्या कादवा नदीवर उंच कमानीचा व्हिक्टोरिया पूल असून या पुलावरून वाहनांची मोठी वर्दळ चालू असते याच पुलाच्या कामानीवर सकाळी ९ ते ११ च्या दरम्यान जळगाव येथील एक मानसिक संतुलन ढासाळलेला तरुण देविदास विष्णू भगरे (वय २२) हा जाऊन बसला होता,

या पुलावरून येणारे जाणारे लोक त्याची मजा पाहत होते, त्याला खाली ये म्हणून सांगत होते, परंतु तो खाली येत नव्हता, ही माहिती निफाड पोलिसांना कळताच पो. नि. गणेश गुरव यांची मार्गदर्शनाखाली पोलीस राजेंद्र दरेडे, विनोद जाधव, खुळे,आदी, हे तात्काळ घटनास्थळी दाखल झाले परिस्थिती कठीण असल्याने अग्निशमन विभागाला कळविण्यात आले परंतु अग्निशमन दलाची गाडी बाहेर गेली होती. पुलाच्या कमानीवर चढण्याची कोणाची ही हिम्मत होत नव्हती ,याने जर नदीत उडी फेकली तर काय करायचे असे अनेक प्रश्न उपस्थितांच्या समोर उभे होते, पोलिस त्याला खाली घेण्यासाठी प्रयत्न करत होते, खाली ये म्हणून सांगत होते, तेव्हा तो तरुण म्हणायचा , मला घरचे खूप त्रास देतात..... मला सेंट्रल जेलला पाठवा ..तरच खाली येतो, ....पोलिसांनी त्याची समजूत काढून मन परिवर्तन केले व त्याला कुठलाही धोका होऊ न देता खाली उतरवण्यात यश आले ,व त्याचे वडील विष्णू भगरे यांचे ताब्यात या तरुणास देण्यात आले. हाच तरुण मागील वर्षी जळगाव येथे असणाऱ्या टेलिफोन टावर वर जाऊन बसला होता त्यावेळीही पोलिसांनी त्याला खाली घेण्यासाठी मोठी कसरत करावी लागली होती ,त्याचा जीव वाचविला होता,या घटनेची सर्वत्र चर्चा होत आहे

**स्वेरीमध्ये पाचवी आंतरराष्ट्रीय परिषद 'टेक्नो- सोसायटल २०२४' चे उद्‌घाटन**

**राजीव गांधी सायन्स अँड टेक्नोलॉजीचे डॉ.नरेंद्र शाह**

# समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणारे पर्यायी तंत्रज्ञान विकसित होणे आवश्यक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : 'समाजासाठी तंत्रज्ञान हा माझ्या आस्थेचा विषय असून स्वेरीतील या आंतरराष्ट्रीय परिषदेचा विषय अतिशय मोलाचा आहे. तंत्रज्ञानाची निर्मिती आणि त्याची सकारात्मक कार्यासाठी अंमलबजावणी करणे ही सोपी गोष्ट नाही. एखाद्या तंत्रज्ञानाचा वापर करताना त्या तंत्रज्ञानाशी संबंधित सर्व छोट्या मोठ्या बाबींचा बारकाईने विचार करणे आवश्यक आहे. समाजाचे प्रश्न शोधणे आणि त्या प्रश्नांची पर्यायी व सर्व सामान्य माणसांना परवडणारी अशी उत्तरे शोधणे हे आज फार गरजेचे आहे. आज आपला देश एका स्थित्यंतराच्या अवस्थेत आहे. तरुणांच्या बदलत्या गरजा पूर्ण करणे हे तंत्रज्ञानासमोरचे एक मोठे आव्हान आहे. तंत्रज्ञानातून ग्रामीण विकास, शिक्षण, पाणी, बेरोजगारी आदी समस्यांवर उपाय शोधणे आवश्यक आहे. आजच्या तरुण पिढीने त्यांच्या क्षेत्राशी संबंधित नसणाऱ्या बाबींचे देखील ज्ञान मिळवले पाहिजे. एकंदरीत आज 'समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणारे पर्यायी तंत्रज्ञान विकसित होणे आवश्यक' आहे असे प्रतिपादन राजीव गांधी सायन्स अँड टेक्नोलॉजी कमिशनचे सदस्य सचिव डॉ. नरेंद्र शाह यांनी केले.

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींगमध्ये स्कूल ऑफ लाईफ सायन्सेस, पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठ सोलापूर व स्वेरी, पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांच्या सहकार्याने पीएम- उषा या योजनेअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या पाचवी आंतरराष्ट्रीय परिषद 'टेक्नो-सोसायटल २०२४' च्या उदघाटन प्रसंगी अध्यक्षस्थानावरून आयआयटी बॉम्बेचे नरेंद्र शहा हे मार्गदर्शन करत होते. जोगदंड महाराजांच्या अनुयायींकडून पंढरीचे माहात्म्य असलेल्या सुरेल अभंगवाणीने कार्यक्रमाला सुरवात झाली. दिपप्रज्वलनानंतर स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांनी मान्यवरांचे, पाहुण्यांचे, सहभागी प्राध्यापक व संशोधकांचे स्वागत करून स्वेरी संस्थेच्या सुरुवातीपासून ते आजपर्यंतच्या यशस्वी वाटचालीवर प्रकाश टाकला. या आंतरराष्ट्रीय परिषदेचे सहसमन्वयक व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार यांनी या आंतरराष्ट्रीय परिषदेची सुरुवात कशी झाली आणि ही परिषद आयोजित करण्यामागचा हेतू स्पष्ट करून २०१६, २०१८, २०२० आणि २०२२ साली झालेल्या परिषदेवर प्रकाश टाकला. यावेळी प्रमुख पाहुणे व उदघाटक म्हणून सिंगापूर मधील एनयुएसचे डॉ. प्रल्हाद वदकेपात मार्गदर्शन करताना म्हणाले की, 'विठ्ठलाच्या पवित्र पावन भूमीत आल्याचा आज मला मनस्वी आनंद झाला. या भागात सर्वात मौल्यवान असणारी गोष्ट म्हणजे मानवता पाहायला आणि अनुभवायला मिळाली. आपण तंत्रज्ञानात कितीही प्रगती साध्य केली तरी कला, कौशल्ये, साहित्य या बाबी कधीही विसरू नयेत. आज आपण इंडस्ट्री ५.० कडे मार्गक्रमण करत आहोत. आर्टीफिशियल इंटेलिजन्स, बिग डेटा इ. क्षेत्रे मनुष्याला सामर्थ्य देणारी आहेत. आपण आपल्या परंपरा, कुटुंब, नातीगोती या बाबी न विसरता तंत्रज्ञानाचा वापर करून पुढे जाणे आवश्यक आहे. यावेळी 'टेक्नो-सोसायटल २०२४'च्या बुक ऑफ अॅबस्ट्रॅक्ट चे प्रकाशन देखील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या पहिल्या दिवशीच्या परिषदेत मलेशियातील हेल्फ विद्यापीठातील प्रा. डॉ. आर. लोगेश्वरन, 'कन्नूर (केरळ) मधील विनोय विष्णू वदक्केपात, गव्हर्मेंट कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कराडचे प्राचार्य डॉ. विनायक कुलकर्णी, आयआयटी बॉम्बेचे डॉ. परमेश्वर उदमले, गुरुनानक देव कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, बिदर (कर्नाटक) चे प्रा. वीरेंद्र डाकुलगी, कृषी विद्यापीठ, अहिल्यानगरचे माजी प्राचार्य डॉ. डी. एस. गोरंटीवार, यूएस मधील डॉ. विशाल धमगाये यांच्यासह महाराष्ट्रासह इतर राज्यातील जवळपास ५०० हून अधिक संशोधक उपस्थित होते. उद्या, शनिवार (दि.१४ डिसेंबर) रोजी ऑनलाईन माध्यमातून अमेरिकेमधून जॉर्ज मेशन विद्यापीठाच्या डॉ. सपना गंभीर, ताश्कंद इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नोलॉजी, उझबेकिस्तानचे डॉ. बोथीर उस्मोनोव्ह, देला सॅली विद्यापीठ फिलिपिन्सचे लॉव सायमन चाटीमबंग, दुबई मधून अमेटी विद्यापीठातील डॉ. व्यंकट रेड्डी पोलुरू, आयआयटी जम्मुचे डॉ. विजयकुमार पाल, मलेशियातील जालन विद्यापिठाचे डॉ. यीप किम हु, आयआयटी भुवनेश्वरचे डॉ. गौरव भरतार्या यांच्यासह तज्ञ संशोधक व अभ्यासक आपले शोध पेपर सादर करणार आहेत. यावेळी बीएआरसीचे शास्त्रज्ञ व्ही.के.सुरी, पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठाचे डॉ. व्ही. बी. पाटील, सिनेट सदस्य डॉ.विरभद्र दंडे, डॉ. राजेंद्र वडजे, गीतादिदी जोगदंड तसेच स्वेरीचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, माजी अध्यक्ष व विश्वस्त नामदेव कागदे, माजी अध्यक्ष व विश्वस्त धनंजय सालविठ्ठल, विश्वस्त एच.एम. बागल, विश्वस्त बी.डी. रोंगे, युवा विश्वस्त प्रा. सुरज रोंगे, स्वेरीच्या चारही महाविद्यालयांचे प्राचार्य, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. या उदघाटन समारंभाचे सूत्रसंचालन एम.बी.ए. विभागाच्या डॉ. मीनल भोरे यांनी केले. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या दिशादर्शक मार्गदर्शनाखाली समन्वयक डॉ. अमरजित केने यांच्या नेतृत्वाखाली 'टेक्नो-सोसायटल २०२४' च्या यशस्वीतेसाठी सर्वजण परिश्रम घेत आहेत.



**क्षणचित्रे-** या परिषदेच्या निमित्ताने बाहेरून आलेल्या पाहुण्यांची निवास व्यवस्था, नाश्ता व सकस भोजन आदी बाबींची स्वेरी कॅम्पस मध्ये उत्तमप्रकारे सोय करण्यात आली आहे. स्वेरी कॅम्पस मध्ये रांगोळीने केलेले स्वागत, फुलांचा दरवळणारा सुगंध आणि संशोधक पाहुण्यांची रेलचेल लक्ष वेधून घेत आहे. परिषदेसाठी आलेल्या संशोधकांना काहीही कमी पडू नये यासाठी स्वेरी संस्थेचे पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व कार्यावर बारीक लक्ष ठेवून आहेत.